**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.०३/२०१७**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१**

**निशाणी क्र.७६ वर पुढे**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती एस.एल.जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांचे मुळ गाव कुडाळ आहे. माझा व्यवसाय शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईचे माहेर ही कुडाळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांचे नाव महिताप पठाण आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वाड वडिलांपासून आम्ही पठाणवाडी कुडाळ येथे राहत होतो. कासमआगा हे कुडाळमध्येच राहण्यास होते याबाबत मला माहिती नाही. हे मला माहित नाही की, कासमआगा यांना बाईमा नावाची मुलगी होती. हे मला माहित नाही की, त्यांना मुलगा होता की नव्हता. हे मला माहित नाही की, महिताप पठाण यांच्या सोबत बायमाचा विवाह झाला होता. हे मला माहित नाही की, महिताप पठाण यांना नजीर खान व हमीद खान ही दोन मुले झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, नजीर खान माझे वडिल आहेत. माझे वडिल १९७९ साली मयत झाले. त्यावेळी साधारण माझे वय १०–११ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, वडिल होते तेव्हा आम्ही सर्व पठाणवाडीत एकत्र राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, वडिल मयत झाल्यानंतर आम्ही सर्व कासमआगा यांच्या वाडयात आईच्या माहेरी राहावयास आलो. पठाणवाडीतील आमचे घर पडले याबाबत मला माहिती नाही. हे मला माहित नाही की, वादी हे आमचे शेजारी सिटी सर्वे नं.११७२ जो वादींच्या वडिलांचा आहे त्यामध्ये राहत होते. हे मला माहित नाही की, त्यावेळी माझे वडिल धान्याचा व मदाचा व्यापार करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आजीचे घर दुरुस्त करुन तळमजला बँकेला भाडयाने दिला. तसेच, वरचा मजला बँक कामगारांना भाडयाने दिला. हे मला माहित नाही की, आम्ही आगावाडयात राहायला आल्यानंतर आम्ही शेजारची ११७१ ही मिळकत खरेदी केली. हे म्हणणे खरे नाही की, आगावाडाच्या शेजारी वादीचे घर सि.स.नं.११७२ आमच्या घराला लागुन होते. हे मला माहित नाही की, त्या घरात वादी त्यांचे आजोबा पंजोबा पासून राहत होते. हे मला

माहित नाही की, वादीचे नोकरीमुळे गावी येणे जाणे असते. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे घर हे आमच्या घराला लागून असल्यामुळे सोयीचे होते. दावा मिळकतीच्या पूर्वेला रस्ता आहे, पश्चिमेला माझे स्वतःचे घर आहे, उत्तरेला जाधवांचे घर आहे, दक्षिणेला रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या घराची दुरुस्ती आमच्या वडिलांनी केली.

प्रश्न– तुम्ही वादीच्या घराची दुरुस्ती केली तेव्हा वादी नोकरीमुळे हजर नव्हते ?

उत्तर– आम्ही आमच्या घराची दुरुस्ती केलेली आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी वादीच्या वडिलांना सांगितले की, तुमच्या जागेच्या बदल्यात माझ्या खरेदीच्या जागेतील दुसरी जागा देतो. हे म्हणणे खरे नाही की, असे सांगुन घराचे बांधकाम पूर्ण केले. हे म्हणणे खरे नाही की, तसे ठरल्यापासून येणारा कर हे वादीच भरत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचे व वादीच्या वडिलांचे संबंध चांगले असल्यामुळे तसे ठरले. हे म्हणणे खरे नाही की,त्याप्रमाणे जागेचे आदला बदलपत्र करण्याचे त्या दोघांमध्ये ठरले. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल नजीर महिताप पठाण यांनी दि.१६.०३.१९७३ रोजी झालेल्या जागेच्या आदला बदलपत्राप्रमाणे व ठरल्याप्रमाणे अर्ज व जबाब ग्रामपंचायत कुडाळ येथे दिला. हे म्हणणे खरे नाही की, त्या अर्जावर व जबाबावर माझ्या वडिलांच्या सहया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या झालेल्या आदला बदलपत्रकाप्रमाणे ग्रामपंचायतीने ठराव क्र.७ पास केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हापासून वादीच्या वडिलांनी आदला बदल जागा माझ्या वडिलांच्या प्रत्यक्ष ताब्यात दिली. हे म्हणणे खरे नाही की, या झालेल्या ठरावाप्रमाणे दि.३०.१०.१९७३ रोजी फेरफार मंजूर झाला. हे म्हणणे खरे नाही की, ती जागा वादीच्या नावावर करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हापासून त्या जागेचा येणारा कर वादीच भरत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी प्रतिवादी विरुद्ध तसेच वादीविरुद्ध तालुका निरिक्षक भूमि अभिलेख जावली यांच्याकडे अपील क्र.१६३३/१९९९ हे दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, १९८० साली कुडाळ येथील सिटी सर्वे झाला. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे करणारी लोक जागेवर आली, त्यांनी पाहणी करुन वहिवाटीप्रमाणे

सदर वाद मिळकतीची जागेप्रमाणे वस्तुस्थिती कागदपत्रे पाहून त्यास सिटी सर्वे नं.११७१ दिला. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३.०१.१९८१ रोजी सिटी सर्वे.नं.११७१ यास वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, अपील क्र. १६३३/१९९९ मध्ये मी हजर होवून माझे म्हणणे व युक्तीवाद दिला होता.

**वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती एस.एल.जाधव यांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ठिकाण : मेढा (रविंद्र भ. खवले)

दिनांक : २२.१०.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.